# <u>प्रेस नोट</u>

**बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पुर्व परिमंडळ ३ अधिनस्त नागरिकांचे चोरी/गहाळ मोबाईल, मौल्यवान मालमत्ता वितरण कार्यक्रमाव्दारे नागरीकांना परत केलेबाबत.**

.........................................................................................................

मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री देवेन भारती यांचे संकल्पनेतून व मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), श्री. मनोजकुमार शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली आज दिनांक २२/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०४:०० वा. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पुर्व परिमंडळ -३ मधील विक्रोळी, पार्कसाईट, भांडूप, कांजूरमार्ग, मुलूंड व नवघर या सर्व ०६ पोलीस ठाण्यांकडून हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल परत करण्याकरिता सामुहिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पुर्व परिमंडळ-३ अधिनस्त पोलीस ठाणेस दाखल जबरी चोरी, घरफोडी, स्नॅचिंग, मोबाईल चोरी, इतर चोरी व गहाळ झालेली मालमत्ता पोलीसांनी तांत्रिक तपास करून हस्तगत केली होती. सदरचे मौल्यवान दागिने, वाहने व मोबाईल असा **एकूण रूपये १,१५,७०,५००/-(अक्षरी रूपये एक कोटी पंधरा लाख सत्तर हजार पाचशे मात्र) किंमतीचा मुद्देमाल हा** मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री धनंजय कुलकर्णी व पोलीस उप आयुक्त श्री अभयसिंह देशमुख यांचे हस्ते संबंधित तक्रारदारांना परत करण्यात आला.

सदर कार्यक्रमामध्ये उपरोक्तप्रमाणे मालमत्ता पोलीसांकडून परत मिळाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करून पोलीसांचे आभार मानले.